## अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ........ 1
उद्दीष्टे ........ 2
प्रस्तावना ........ 2
जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ........ 3
आंतरराष्ट्रीय अर्थ संस्था ........ 9
जागतिक बँक – भूमिका आणि कार्ये ........ 10
आंतरराष्ट्रीय नाणे निधी - भूमिका आणि कार्ये ........ 15
जागतिक व्यापार संघटना - भूमिका आणि कार्ये ........ 19
आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांच्या कार्याचे परिक्षण ........ 27
समारोप ........ 29
प्रश्न ........ 30

## उद्दीष्टे

1. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या तीन संकल्पना समजावून घेणे.
2. त्यांचा राजकारणावर आणि समाजकारणावर होणारा परिणाम जाणून घेणे – हे करीत असताना ह्या संकल्पनांच्या अंमलबजावणीमधून निर्माण होणा-या समस्यांचा आढावा घेणे, एकूण फायद्यातोट्यांचे गणित मांडणे.
3. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक व्यापार संघटना यांनी जागतिकीकरणाच्या प्रसाराला मदतच केली आहे. ह्या तीन आंतरराष्ट्रीय संघटनांची रचना आणि इतिहास थोडक्यात समजावून घेऊन त्यांच्या भूमिकेचा आणि प्रत्यक्ष कार्याचा चिकीत्सक आढावा घेणे ही या पाठाची मुख्य उद्दीष्टे आहेत.

## प्रस्तावना

१९९० च्या सुमारास संपलेले शीतयुद्ध आणि त्यानंतरचे दारिद्र्य, आरोग्य, मानवी हक्क, दहशतवाद यांसारखे महत्त्वाचे प्रश्न, या आंतरराष्ट्रीय घडामोडींसंबंधी संयुक्त राष्ट्रे आणि त्याच्याशी संल्गन असलेल्या संघटनांनी घेतलेली भूमिका आणि केलेले कार्य, जगाचे अर्थकारण, विकासाचे प्रश्न, त्याच्याशी संबंधीत पर्यावरण संरक्षणाचे प्रश्न, स्त्रीयांच्या चळवळी, या सर्व प्रश्नांचा अभ्यास आपण या विषयामध्ये करणार आहोत.
शासनसंस्थांच्या पलीकडे नागरी समाजाने स्वयंस्फूर्तीने जगभर काही प्रयत्न केले आहेत. यामध्ये विविध स्वयंसेवी संस्थांचे कार्य आपण अभ्यासणार आहोत.

या सर्व मुद्द्यांपैकी या पाठात आपण जगाच्या अर्थकारणावर भर देणार आहोत. भांडवलवाद आणि साम्यवाद या दोन परस्परविरोधी राजकीय आणि आर्थिक व्यवस्था आहेत. भांडवलवाद खुली स्पर्धा, खुला बाजार, बाजाराच्या नियमांनुसार मालाच्या किंमती निश्चित करणे, सरकारचा कमीतकमी हस्तक्षेप, उद्योजकांना पूर्ण आर्थिक स्वातंत्र्य इत्यादी बाबी मानतो याउलट साम्यवादामध्ये स्पर्धेला स्थान नाही. साम्यवादानुसार स्पर्धा म्हणजे संसाधनांचा अपव्यय – म्हणजेच उपलब्ध साधने वाया घालवणे, बाजारावर शासनाचे संपूर्ण नियंत्रण, खाजगी मालकीची संकल्पना रद्द करणे ही साम्यवादाची काही वैशिष्ट्ये आहेत. सोव्हिएट रशिया आणि त्याच्या मित्र राष्ट्रांनी साम्यवादाचा पुरस्कार केला तर अमेरिका आणि तिच्या मित्र राष्ट्रांनी भांडवलवादाचा पुरस्कार केला.

भांडवलवाद विरुद्ध साम्यवाद या संघर्षात शीतयुद्ध संपताना साम्यवादाचा पराभव झाला आणि जगभर भांडवलवादाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. अमेरिका आणि तिची पश्चिम युरोपातील मित्र राष्ट्रे भांडवलवादाचे समर्थन करतात. त्यामुळे तो एकप्रकारे त्यांचा विजय होता. आज जगात अमेरिका ही एकमेव महासत्ता शिल्लक राहीली आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रिया म्हणजे भांडवलवादाचे आधार आहेत. त्याचा जेवढा प्रसार होईल तेवढा भांडवलवाद यशस्वी होईल. या सर्व पार्श्वभूमीवर आपल्याला खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा अभ्यास करायचा आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक व्यापार संघटना या तीन आंतरराष्ट्रीय संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे आपण त्यांचाही सखोल अभ्यास करणार आहोत.

## जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या तिन्ही संकल्पना एकमेकांशी जोडलेल्या आहेत, त्या एकमेकांवर अवलंबून आहेत आणि त्यांचा एकमेकांवर परिणाम होतो. युरोप आणि अमेरिकेत सुरवातीपासून अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर खाजगी उद्योगांच्याच ताब्यात होती. सर्वच क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली होती. त्यांच्या व्यवस्था जेव्हा विकसित झाल्या तेव्हा त्यांनी जागतिक बाजाराचा विचार करण्यास सुरवात केली. परंतु बहुतेक देशांमध्ये बंदीस्त अर्थव्यवस्था होत्या. ही व्यवस्था बदलण्यासाठी जागतिकीकरणाच्या चळवळीला सुरवात झाली. त्यामुळे विकसनशील देशांमध्ये जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रिया सुरु झाल्या.

## खाजगीकरण

खाजगीकरण म्हणजे सरकारी मालकीचे उद्योग खाजगी उद्योजकांना विकणे. विविध उद्योगांमध्ये गुंतवलेले सरकारी भागभांडवल काही प्रमाणात किंवा पूर्णपणे काढून घेणे म्हणजे खाजगीकरण. यालाच निर्गूंतवणूक असेही म्हणतात. उदा. मारूती उद्योगाचे खाजगीकरण झाले, विदेश संचार निगमचे खाजगीकरण झाले. अर्थात या दोन्ही कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या प्रक्रियेतही फरक आहे. मारूती उद्योगाच्या समभागांची खुल्या बाजारात विक्री करण्यात आली तर विदेश संचार निगम टाटा कंपनीला विकण्यात आले. खाजगीकरण विविध मार्गांनी होऊ शकते. बाँबे सबर्बन इलेक्ट्रीक सप्लाय कंपनी (BSES) ही मुंबईच्या उपनगरांना वीजपुरवठा करणारी कंपनी रिलायन्स समूहाने विकत घेतली. एअर इंडियाच्या खाजगीकरणाची चर्चा चालू आहे. भारत संचार निगम विकत

घ्यावे अशी ब-याच मोठ्या उद्योगांची इच्छा आहे. सरकारही एक एक कंपनी विकून आपला आर्थिक बोजा कमी करते आहे. १९९९ साली भारतात केंद्रीय अर्थमंत्रालयांतर्गत एक नवीन निर्गूंतवणुक विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागामार्फत खाजगीकरणाचे धोरण राबविले जाते. http://www.divest.nic.in/ या संकेतस्थाळावर आजवर केलेल्या निर्गूंतवणुकीसंदर्भात सर्व माहीती उपलब्ध आहे. फायद्यात चालणा-या सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करावे अशी मागणी विविध उद्योगपतींकडून सतत होत असते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणूनच खाजगीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळते.

१९९१ साली नरसिंहराव सरकारने खाजगीकरणाच्या धोरणाची सुरवात केली. त्यानंतर १९९८ ते २००४ या काळात सत्तेवर असलेल्या भाजपप्रणित आघाडीच्या सरकारने वेगाने हे धोरण पुढे नेले. त्यांनंतर सत्तेमध्ये आलेल्या काँग्रेस आघाडीने हे धोरण तसेच चालू ठेवले आहे. फक्त त्याचा वेग काही प्रमाणात कमी केला आहे.

मोठ्या उद्योगांना खाजगीकरणामुळे फायदा झाला आहे. फायद्यात चालणा-या मोठ्या सरकारी कंपन्या त्यांच्या ताब्यात येत असल्यामुळे त्यांची ताकद वाढते आहे. मूलभूत साधने त्यांच्या हाती येत आहेत. सरकारची जबाबदारी कमी होते आणि गुंतवणुक कमी होते. सरकारकडे निधी उपलब्ध होतो. त्यामुळे या प्रक्रियेत सरकारचाही फायदा आहे. इतर महत्त्वाच्या विकास कामांसाठी सरकारच्या हाती पैसा येतो असा सरकारचा दावा असतो. खाजगीकरणामुळे शासनाची मक्तेदारी संपून स्पर्धा वाढते त्यामुळे उत्पादनाचा दर्जा वाढतो किंमतींवरही नियंत्रण येते, ग्राहकांना विविध सेवा आणि वस्तूंची निवड करण्याची संधी मिळते आणि त्यामुळे अंतिमतः ग्राहकांचा फायदा होतो असा खाजगी उद्योजकांचा दावा आहे.

कामगारांचे हाल मात्र या व्यवस्थेमुळे वाढलेले आहेत. त्यांच्या नोकरीची शास्वती राहीलेली नाही. कायमस्वरुपी कामगार ठेवण्याऐवजी कंत्राटी पद्धतीने काम करून घेण्याकडे खाजगी उद्योगांचा कल दिसतो आहे. सरकारी व्यवस्थे मध्ये कामगार संघटनांना मानाचे स्थान होते. खाजगी उद्योजक मात्र संघटना उभीच राहणार नाही या दृष्टीने आपली धोरणे आखतात. निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि स्वस्त दरात कर्ज, घरासाठी कर्ज, मुलांच्या शिक्षणाची सोय, पाळणाघरांची सोय अशाप्रकारच्या सोयी सवलती देण्यासही खाजगी उद्योजक फारसे उत्सूक नसतात. खाजगी उद्योजक माणसांपेक्षा यंत्रसामुग्री आणि तंत्रज्ञानामध्ये गुंतवणुक करण्याला प्राधान्य देतात. ( Capital intensive technique instead of labour intensive technique) अधिकातअधिक यांत्रिकीकरण

करून कामगार कमी करण्यावर त्यांचा भर असतो. त्यासाठी कधी स्वेच्छा निवृत्ती योजना मांडल्या जातात.

शिक्षण, आरोग्य, पाण्याचे व्यवस्थापन यासारख्या मूलभूत व्यवस्थांमध्ये खाजगीकरण होत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना या सेवांसाठी खुल्या बाजारातील भाव परवडत नाहीत. त्यांना या सेवांपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे विषमता वाढू लागली आहे. समाजातील दुर्बल घटकांवर अन्याय होतो.

खाजगीकरणाचा अतिरेक घातक ठरतो. याचा चांगलाच अनुभव अमेरिकेने घेतला आहे. त्यांनी त्यांच्या विमानतळांवरील सुरक्षाव्यवस्था खाजगी संस्थांकडे दिली. या संस्थांनी ती फारशा गांभिर्याने घेतली नाही. ९ /११ च्या अनुभवानंतर मात्र ती यंत्रणा पुन्हा सरकारी सुरक्षा संस्थांकडे द्यावी लागली. तसेच लुइझियाना राज्यातही चक्रीवादळानंतर स्थानिकांच्या पुनर्वसनाचे काम खाजगी संस्थांकडे दिल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाल्याची चर्चा होती.

## उदारीकरण

उदारीकरण हा शब्द अर्थ व्यवस्थेच्या संदर्भात आपण वापरणार आहोत. अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारणे म्हणजे उदारीकरण. उदार धोरण म्हणजे मुक्त अर्थ व्यवस्थेचे धोरण, खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण – थोडक्यात उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था खुली करणे. किंमतींवरचे सरकारी नियंत्रण काढून टाकणे, परवाने आणि लायसन्स ची पद्धत रद्द करणे, परकीय भांडवलाचे स्वागत करणे.

उदारीकरण म्हणजे अर्थव्यवस्था देशी आणि विदेशी खाजगी संस्थांसाठी खुली करणे. काही वेळेस काही देशांमध्ये देशी आणि विदेशी संस्थांसाठी वेगळे नियम लागू केले जातात. देशी संस्थांना संरक्षण देण्याचा मुख्य उद्देश त्यामधे असतो. या प्रक्रियेचा वेग किती ठेवायचा तेही संबंधित सरकारच ठरवते.

व्यवस्थेमधील सरकारी कंपन्यांची मक्तेदारी संपुष्टात आणुन एखाद्या क्षेत्रात खाजगी कंपन्यांना व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात येते. पण याचा अर्थ त्या क्षेत्रातील सर्व सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण केले जाते असे नाही. उदा. नव्वदच्या दशकात केंद्र सरकारने विम्याचे क्षेत्र खुले केले. त्याआगोदर केवळ LIC आणि तिच्या सहाय्यक सराकारी कंपन्यांना विमा क्षेत्रात व्यवसाय करण्याचा अधिकार होता. हे क्षेत्र खुले

केल्यावर मात्र अनेक खाजगी कंपन्यांनी या व्यवसायात प्रवेश केल्याचे दिसून येते. परंतु आजही LIC कार्यरत आहे.

अर्थव्यवस्था शासननियमांच्या बंधनात कधी आणि कशी अडकली ते थोडक्यात पाहू - समाजवाद, साम्यवाद, नियोजित अर्थव्यवस्था या सर्व संकल्पनांमधुन शासन नियंत्रित अर्थव्यवस्थेची संकल्पना पुढे आली. शासननियंत्रित समाज आणि राज्य हा साम्यवादी विचाराचा गाभाच आहे. शासनाने सर्व व्यवस्था स्वतःच्या ताब्यात घेऊन समाजात समानता प्रस्थापित करावी, खाजगी मालमत्ता ही संकल्पनाच रद्द करावी असे साम्यवादाचे तत्वज्ञान सांगते. त्यामुळे साम्यवादी देशांमध्ये अर्थव्यवस्थेचे संपूर्ण नियंत्रण शासनाच्या हाती होते/असते. त्यांची अर्थव्यवस्था बंदीस्त असते.

भारतासारख्या देशांनी साम्यवादी व्यवस्था स्वीकारली नसली तरी १९५० च्या दरम्यान नियोजनाचे तत्त्व स्वीकारले होते. नियोजित अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेमुळेच शासनाचे अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण वाढत गेले.

बाजार मागणी आणि पुरवठ्यानुसार चालतो. त्यामुळे बाजारामध्ये अनिश्चितता असते. कोणाचा फायदा होईल आणि कोणाचा तोटा होईल ते खात्रीने सांगता येत नाही. प्रचंड स्पर्धा असते. या स्पर्धेमध्ये बलवान स्पर्धक विजयी ठरतात, दुर्बलांचा कोणीही वाली नसतो. बाजार आणि बाजारातील खाजगी उद्योजक कोणत्याही वस्तूचे उत्पादन करताना किंवा कोणतीही सेवा पुरविताना केवळ नफ्याचाच विचार करतात. खाजगी उद्योजक कामगारांच्या हीताचा विचार करीत नाहीत. त्यांना सामाजिक जबाबदारीचे भान नसते. त्यांच्यामधील स्पर्धेमुळे अमूल्य संसाधनांचा विनाश होतो. ग्राहकांना योग्य भावात वस्तु आणि सेवा मिळत नाहीत. किंमतीमध्ये भरमसाठ वाढ होते. तसेच शेती मालाला चांगला भाव मिळत नाही. या सर्व कारणांसाठी विविध देशांच्या सरकारांनी अर्थव्यवस्था मुक्त ठेवण्याऐवजी, म्हणजेच बाजाराच्या हाती सोपविण्याऐवजी अर्थव्यवस्थेवर बंधने घालणे पसंत केले.

परंतु काही काळानंतर जगातील सर्वच बंदीस्त किंवा शासननियंत्रित अर्थव्यवस्थांना काही समस्यांना तोंड द्यावे लागले. त्या यशस्वी होऊ शकल्या नाही. किंमतींचे नियंत्रण सरकारांनी आपल्या हाती ठेवले होते. महाग दराने एखादी वस्तु आयात करावी लागली तरी ग्राहकांना ती स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्याच्या अट्टाहासामुळे या शासन व्यवस्थांना आर्थिक तोटा सहन करावा लागला. नव्याने आयात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संस्थांकडून आणि देशांकडून कर्ज काढावे लागले. हे देश कर्जबाजारी झाले आणि शेवटी

त्यांच्या अर्थव्यवस्था कोलमडून पडल्या. चीनने वेळीच (१९७९ च्या दरम्यान) आपली अर्थव्यवस्था खुली करण्यास सुरवात केली. परकीय भांडवलाचे स्वागत केले. त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था टिकून आहे, वाढते आहे.

१९८० च्या दशकात जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात झाली. आज भारतात पेट्रोलियम, दूरचित्रवाणी, रेडीओ, दूरसंचार, वीजनिर्मिती, विमा इत्यादी क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली.

## जागतिकीकरण

जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था इतर देशांसाठी (म्हणजे मुख्यतः इतर देशातील कंपन्यांसाठी) खुली करणे. देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडून घेणे. आपल्या देशात इतरांना मुक्तपणे व्यापार आणि आर्थिक व्यवहार करु देणे आणि आपण इतरांच्या देशात त्याचप्रकारे व्यापार आणि आर्थिक व्यवहार करणे. १९९० मध्ये सोव्हिएट युनियनचा पाडाव झाल्या नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला.

१९८० नंतर जगभर काही राष्ट्रांकडून अर्थव्यवस्था खुली करण्याच्या आग्रहाला सुरवात झाली. यामध्ये अर्थातच अमेरिका, यु. के. (इंग्लंड) या राष्ट्रांचा पुढाकार होता. १९८९ मध्ये बर्लिनची भिंत आणि त्यापाठोपाठ पूर्व युरोपातील साम्यवादी व्यवस्था कोसळल्यानंतर या प्रक्रियेला वेग आला. १९९१ मध्ये सोव्हिएट रशिया (USSR) नष्ट झाल्यानंतर जागतिकीकरणाची प्रक्रिया परत उलट दिशेने जावू शकेल ही काही भांडवलवादी राष्ट्रांच्या मनातील भीती नाहीशी झाली.

जागतिकीकरणामुळे प्रगत देशांना नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात. त्यांच्याकडील प्रगत तंत्रज्ञानामुळे तसेच कायदा, अर्थव्यवहार, माहिती तंत्रज्ञान या बाबतीतील अफाट कौशल्यामुळे ते या नवीन बाजारपेठांमधील स्पर्धांमध्ये इतर स्थानिक स्पर्धकांना सहज मागे टाकतात आणि सहजपणे बाजारपेठ काबीज करतात. त्यांना स्पर्धकच उरत नाही. त्यामुळे त्यांना जागतिकीकरण वेगाने व्हावे असे वाटते.

मागास देशांचाही या प्रक्रियेत फायदा होतो. त्यांना नवीन तंत्रज्ञान उपलब्ध होते. भांडवल उपलब्ध होते. पण त्याचबरोबर प्रगत राष्ट्राच्या जीवनशैलीचा प्रभाव त्यांच्यावर पडतो. सांस्कृतिक संघर्षाला सुरवात होवू शकते. भांडवली तंत्राचा वापर केल्याने यंत्राचा

वापर वाढून माणसांची-कामगारांची गरज कमी होते. कामगार कपातीला सुरवात होते. बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होतो.

अमेरिका आणि पश्चिम युरोपातील प्रगत देशांनी जागतिकीकरणाचा आग्रह धरला. साम्यवादी चीनने १९७९ पासून राजकीय व्यवस्था बंदीस्त ठेऊन आर्थिक बदल करण्यास सुरवात केली. त्यांनी त्यांच्या अटींवर पश्चिमेकडील आर्थिक महासत्तांना चीनमध्ये प्रवेश दिला. मेक्सिको, इंडोनेशिया, मलेशिया या काही देशांनी पश्चिमेकडील देशांच्या सूचनांप्रमाणे आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांच्या म्हणण्याप्रमाणे आर्थिक बदल स्वीकारले. परंतु त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. रशियाने पुतीन यांच्या नेतृत्वाखाली वेगळ्या मार्गाने जागतिकीकरण स्वीकारले. त्यांचाही गेल्या दशकात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकास झालेला दिसतो. भारताने सावध पाऊले उचलत आर्थिक सुधारणांचा मार्ग स्वीकारला. भारत सरकारला प्रचंड अंतर्गत विरोधाला तोंड द्यावे लागले.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्वत्र काही समान अनुभव आले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीत वाढ झाली आहे. परंतु उत्पन्नाचे समान वितरण झालेले नाही. समाजातील असमानता वाढीस लागली आहे. श्रीमंत वर्गाला फायदा झाला आहे. गरीब अधिक अडचणीत आले आहेत. श्रीमंत आणि गरीबांमधील दरी वाढली आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. जगातील सर्व देश आर्थिक विकासाच्या समान पातळीवर नाहीत. जगाच्या सर्व भागांचा विकास समप्रमाणात झालेला नाही. काही देश विकसित आहेत, काही विकसनशील, काही मागास तर काही अती मागास.

(http://www.un.org/special-rep/ohrlls/ldc/list.htm संयुक्त राष्ट्रांच्या या संकेतस्थळावर मागास देशांची यादी देण्यात आली आहे. यापैकी ३२ देश WTO चे सदस्य आहेत त्यांची यादी http://www.wto.org/english/thewto_e/whatis_e/tif_e/org7_e.htm या संकेत स्थळावर आहे.)

साधारणपणे उत्तर अमेरिका (कॅनडा, अमेरिकेची संयुक्त संस्थाने - USA) पश्चिम युरोप (यु. के., फ्रान्स, जर्मनी, नॉर्वे, स्वीडन, हॉलंड, डेन्मार्क इ.) आखाती देश (तेल उत्पादक) ऑस्ट्रेलिया, जपान हे देश श्रीमंत देशांमध्ये गणले जातात. यामधील आखाती देश सोडले तर इतर सर्व देशांकडे प्रगत तंत्रज्ञान आहे त्यामुळे ते आखाती देशांपेक्षा काकणभर सरसच आहेत. भारत, ब्राझिल आणि दक्षिण अमेरिकेतील बरेचसे देश विकसनशील देशांमध्ये मोडतात. आफ्रिका खंडातील सहारा वाळवंटाच्या दक्षिणेला असलेले बरेचसे देश मागास आणि अतिमागास देशांमध्ये गणले जातात. आर्थिक परिस्थिती

वेगळी असल्यामुळे विकासाच्या प्रक्रियेकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा आहे. प्रगत, विकसित देशांना जागतिकीकरण म्हणजे सुवर्णसंधी वाटते तर विकसनशील आणि मागास देशांना जागतिकीकरण म्हणजे संकट किंवा समस्या वाटते. काही देशांना ही प्रक्रिया अपरिहार्य वाटते. काही जणांना दुर्बल राष्ट्रांचे शोषण करण्याचा बड्या राष्ट्रांचा कुटील डाव वाटतो त्यामुळेच आर्थिक साम्राज्यवाद अशा शब्दात काही विचारवंत जागतिकीकरणाची संभावना करतात. देशांतर्गत परिस्थिती साधारण तशीच आहे – उदा. भारतात श्रीमंत आणि बड्या उद्योगपतींना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा लाभ झाला आहे. इन्फोसिस, विप्रो, टाटा उद्योग समूह, रिलायन्स उद्योगसमूह, बिरला उद्योग समूह यासारख्या अनेक मोठ्या भारतीय भांडवलदारांनी या संधीचा भरपूर फायदा घेतला आहे. त्यांना अधिक लाभ अपेक्षित आहे आणि त्यामुळेच ते अधिक आक्रमक पणे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण राबविण्याचा आग्रह धरीत आहेत.

**आंतरराष्ट्रीय अर्थ संस्था**

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी या संस्थांची स्थापना विकासासाठी झाली नव्हती. १९१८ ते १९३९ या दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात निर्माण झालेल्या आर्थिक गोंधळाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झाली होती. या काळात प्रचंड चलनवाढ झाली होती. राष्ट्रांच्या परकीय चलन गंगाजळीमध्ये प्रचंड उतारचढाव येवून गेले. विनिमय दरांमध्ये तीव्र स्वरुपाचे बदल झाले.

जागतिक बँक, आंतराष्ट्रीय नाणेनिधी, गॅट करार आणि १९९५ साली त्याची जागा घेणारी जागतिक व्यापार संघटना या दुस-या महायुद्धाच्या अंती म्हणजेच १९४५ ते १९५० च्या दरम्यान अमेरिकेच्या पुढाकाराने आणि युरोपातील तिच्या मित्र राष्ट्रांच्या सहमतीने स्थापन आणि कार्यरत झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मूर्त स्वरुप देण्यासाठीच या संस्थांची स्थापना करण्यात आली.

जगातील बहुतांश राष्ट्रे आज या तीन संस्थांचे सभासद आहेत - जागतिक बँक. आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी - 188 तर जागतिक व्यापार संघटनेचे 161 सदस्य. (जगात एकूण १९५ राष्ट्रे आहेत, म्हणजेच 96 टक्के राष्ट्रे जागतिक बँकेची तर जवळपास 82 टक्के राष्ट्रे जागतिक व्यापार संघटनेचे सभासद आहेत. जागतिक व्यापार संघटनेची सदस्य संख्या सध्या कमी दिसत असली तरी अजून 23 राष्ट्रांनी सभासदत्वासाठी अर्ज केले आहेत असे संघटनेचे प्रतिपादन आहे. काही उपचार पूर्ण झाल्यावर नजीकच्या

भविष्य काळात त्यांना सदस्यत्व मिळेल, त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेची सदस्य संख्या तितकीच म्हणजे १८१ (९१ टक्के) लवकरच होईल. संघटनेच्या म्हणण्याप्रमाणे तिच्या सदस्यांमध्ये ७५ टक्क्यांच्या आसपास विकसनशील आणि अविकसत राष्ट्रे आहेत. सभासद संख्येची एवढी विस्ताराने चर्चा केली कारण त्यामधुन आजच्या जगात या संस्थांना कितपत मान्यता आहे ते स्पष्ट होते. केवळ ६ ते 18 टक्के राष्ट्रे या व्यवस्थेच्या बाहेर आहेत. यापैकी बरीचशी राष्ट्रे छोटी आणि एकूणच आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारावर आणि व्यापारावर ज्यांचा फारसा परिणाम होत नाही किंवा सहभाग नाही अशी आहेत.

## जागतिक बँक – भूमिका आणि कार्ये

**स्थापना – १९४४**
**सदस्य – 188**
**मुख्यालय – वॉशिंग्टन डी. सी. (अमेरिकेची राजधानी)**
**शाखा – जगभर पसरलेल्या १०० हून अधिक शाखा**
**कर्मचारी – १०,००० हून अधिक**

जागतिक बँकेची काही जाहीर उद्दीष्टे-

1. संपूर्ण जगातून दारिद्र्य नष्ट करणे , त्यासाठी निष्ठेने आणि व्यावसायिक वृत्तीने कार्य करणे
2. सर्वाधिक गरीब देशातील सर्वाधिक गरीब जनतेला मदत करणे,
3. तसेच सर्व जगाने मान्य केलेली सहस्त्रक विकास उद्दीष्टे प्रत्यक्षात आणण्यासाठी जागतिक बँक राष्ट्रांना मदत करणे
4. विकसनशील राष्ट्रांना आर्थिक आणि तांत्रिक मदत करणे
5. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांना एकत्र काम करण्यास मदत करणे, त्यांच्यामध्ये अधिकात अधिक भागीदारी होईल यासाठी प्रयत्न करणे.
6. स्थायी आणि चिरंतन स्वरुपाच्या जागतिकीकरणाच्या दृष्टीचा प्रसार करणे
7. दारिद्र्य् निवारणासाठी जगभरात विकासाला चालना देणे, आर्थिक संधी उपलब्ध करणे
8. गरिबांनी या संधींचा फायदा घ्यावा म्हणून त्यांना मदत करणे
9. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे

10. आज बँकेचे मुख्य लक्ष आफ्रिकेतील मागास देशांच्या विकासावर केंद्रीत आहे.
11. युद्ध किंवा अंतर्गत संघर्षामुळे ज्यांचा विकास खुंटला आहे अशा राष्ट्रांनाही बँक मदत करते
12. मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी बँक मदत करते.
13. राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे संपूर्ण मानवी समूहाला ग्रासणा-या समस्यांच्या निवारणासाठी बँक प्रयत्न करते. यामध्ये पर्यावरणातील बदल आणि त्यामुळे निर्माण होणारे अनेक प्रश्न, संसर्गजन्य रोगांचा प्रसार, जागतिक व्यापार इत्यादी बाबींचा समावेश होतो.
14. जागतिक बँक विकसनशील राष्ट्रांसाठी निधी आणि ज्ञान उपलब्ध करुन देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून आपली भूमिका पार पाडते.

जागतिक बँक तिच्याशी संलग्न पाच संस्थांबरोबर काम करते. यांनाच जागतिक बँक गट (World Bank Group) असेही संबोधले जाते. या पाच संस्था खालीलप्रमाणे आहेतः-

- आंतरराष्ट्रीय पुनर्रचना आणि विकास बँक (जागतिक बँक) The International bank for reconstruction and development IBRD i.e. The World Bank - स्थापना 1944, सदस्य १८५, वर्ष २००६ मध्ये ३३ देशातील ११२ प्रकल्पांना १४.१ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज.

- आंतरराष्ट्रीय विकास संघ(The International Development Association) - स्थापना १९६०, आज १६६ सभासद, यापैकी ८२ देश हे जगातील सर्वात गरीब देश आहेत. स्थापने पासून आजपर्यंत १६१ अब्ज डॉलरची मदत या संस्थेने केली आहे.
- आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ The International Finance Corporation

- बहुराष्ट्रीय गुंतवणुक संस्था Multilateral Investment Guarantee Agency

- आंतरराष्ट्रीय गुंतवणुक तंटा निवारण केंद्र The International Centre for settlement of investment disputes

जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोन स्वतंत्र संस्था आहेत. जागतिक बँक मुख्यतः विकसनशील राष्ट्रांना मदत करते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था स्थिर राखण्याचा प्रयत्न करते. विविध देशांच्या चलनावर या निधीचे लक्ष असते.

१९४६ प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली तेव्हा जागतिक बँकेचे ३८ सदस्य होते. १९५० आणि ६० च्या दशकात अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्यापैकी बहुतेकांनी बँकेचे सदस्यत्व घेतले त्यामुळे याकाळात बँकेच्या सभासदांची संख्या एकदम वाढली. सदस्यांची संख्या वाढली तशा त्यांच्या गरजा वाढल्या, त्यांचे स्वरुप बदलले. बदलत्या गरजा भागविण्यासाठी बँकेचा विस्तार करून चार नव्या संस्था निर्माण केल्या गेल्या. जागतिक बँकेचे मुख्य कार्यालय वॉशिंग्टन येथे आहे. शिवाय जगभरात १०० च्या वर कार्यालये आहेत.

**बँकेचे नियामक मंडळ (Board of Governors)**

बँकेचे कार्य एखाद्या सहकारी संस्थेसारखे चालते. सर्व सभासद राष्ट्रे बँकेचे भागधारक (share holders) आहेत. प्रत्येक सभासद देश आपले प्रतिनिधी पाठवतो. हे प्रतिनिधी सहसा त्या देशाचे अर्थमंत्री अथवा केंद्रीय बँकेचे प्रमुख असतात. प्रत्येक सदस्याबरोबर एका पर्यायी सदस्याची निवड केली जाते. ही निवड संबंधीत राष्ट्राच्या शासनाकडून केली जाते. सर्व प्रतिनिधींचे मिळून एक नियामक मंडळ असते. या नियामक मंडळात सर्व निर्णय घेतले जातात. निर्णय घेण्याचे सर्वोच्च अधिकार या नियामक मंडळाला असतात. नियामक मंडळाची बैठक वर्षातून एकदा होते.

**संचालक मंडळ**

नेहमीचे कामकाज करण्यासाठी नियामक मंडळ २४ कार्यकारी संचालकांचे संचालक मंडळ निवडून देते. फ्रान्स, जर्मनी, जपान, ब्रिटन ( UK) आणि अमेरिका (USA) या पाच सर्वात मोठ्य भागधारकांचे प्रत्येकी एक संचालक असतात तर इतर १९ संचालक उर्वरीत १८० देशांचे प्रतिनिधीत्व करतात. बँकेचे अध्यक्ष संचालक मंडळाचे नेतृत्व करतात. आजपर्यंतच्या परंपरेप्रमाणे अमेरिकेचे अध्यक्ष अमेरिकन नागरिकाला पाच वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष पदावर नियुक्त करतात. या नियुक्तीला बँकेच्या नियामक मंडळाची मंजुरी मिळणे आवश्यक असते. सर्वात मोठी भागधारक असल्यामुळे अमेरिकेला तो अधिकार देण्यात आला आहे. कालावधी संपल्यानंतर त्यांची पुन्हा

नियुक्ती होवू शकते.        (सध्याचे अध्यक्ष)[1]  संचालक मंडळाची बैठक आठवड्यातून किमान दोन वेळेस तरी होते.

**उपाध्यक्ष**

अध्यक्षांच्या मदतीला बँकेचे उपाध्यक्ष असतात.  आफ्रिका, पूर्व आशिया आणि पॅसिफिक, युरोप आणि मध्य आशिया, दक्षिण अमेरिका आणि कॅरेबियन देश, मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका आणि दक्षिण आशिया अशा सहा विभागांसाठी सहा उपाध्यक्ष काम करतात.  याशिवाय काही उपाध्यक्षांकडे मानवी विकास, दारिद्रय निवारण यासारखे स्वतंत्र विषय देण्यात आले आहेत.

**बँकेचे कार्य**

१९४४ मध्ये बँकेची स्थापना झाली.  सुरवातीस दुस-या महायुद्धामुळे उध्वस्त झालेल्या युरोपला सावरण्यास मदत करणे इतकेच बँकेचे उद्दीष्ट होते.  परंतु पुढील दशकांमध्ये बँकेच्या कामाचा व्याप वाढत गेला.  जगभरातील दारिद्र्याचे निवारण करण्याचे मोठे कठीण कार्य बँकेने हाती घेतले.

१९६८ मध्ये रॉबर्ट मॅक्नमारा यांची बँकेच्या अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी बँकेच्या धोरणांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले.  शाळा आणि दवाखाने उभी करणे, साक्षरतेचा प्रसार, शेती सुधारणा या विषयांवर लक्ष केंद्रीत केले.  त्यांनी विकसनशील आणि गरीब देशांना कर्ज देण्याची प्रक्रिया सोपी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बँकेचे भांडवल वाढविण्याचे नवे मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला.

आपल्या नवउदारमतवादी धोरणांसाठी नंतर  प्रसिद्ध झालेले अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी ए. डब्ल्यु क्लॉउसन यांची १९८० साली मॅक्नमारा यांच्या जागी नियुक्ती केली.  क्लॉउसन यांनी मोठ्या प्रमाणावर धोरणात्मक बदल केले.  १९८२ साली अनी क्रुगर यांची मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली.  क्रुगर बाईंचा मॅक्नामारा यांच्या विकासाला चालना देणा-या धोरणांना असलेला विरोध सर्वांनाच माहित होता.  या काळात विकसनशील देशांना मुख्यतः त्यांची कर्जे फेडण्यासाठी कर्ज देण्यात आले.  विकसनशील देशांनी आपल्या अर्थ व्यवस्था सुधाराव्यात यासाठी त्यांच्यावर दबाव

[1] Kristalina Ivanova Georgieva-Kinova is a Bulgarian politician and the current chief executive officer of the World Bank. Until 2017, she was European Commissioner for Budget and Human Resources in the college of the Juncker Commission

आणण्यात आला. विकसनशील देशांनी कल्याणकारी योजना बंद करून तो पैसा अर्थ व्यवस्था सुधारण्यासाठी वापरावा असा आग्रह धरण्यात आला. त्यादृष्टीने विकसनशील देशांसाठी अर्थव्यस्थेमध्ये रचनात्मक बदल ( Structural Adjustment) करण्याचे कार्यक्रम आखून देण्यात आले. या कार्यक्रमांच्या माध्यमातून मुख्यतः मुक्त बाजारपेठेची अर्थव्यवस्था लादण्याचा प्रयत्न केला गेला. यामध्ये खाजगीकरण, उदारीकरण, व्यापारावरील आणि परदेशी गुंतवणुकीवरील बंधने दूर करणे या बाबींचा समावेश होता. चलनाचे अवमूल्यन करावे, किंमतींवरील नियंत्रण संपवावे, सर्व प्रकारच्या सबसीडी बंद कराव्यात, परदेशी गुंतवणुकदारांच्या हिताचे रक्षण करावे, प्रशासनात सुधारणा करुन भ्रष्टाचाराला आळा घालावा इत्यादी अटी घालण्यात आल्या. वॉशिंग्टन कन्सेन्सस मध्ये याच प्रकारच्या अटींचा समावेश करण्यात आला होता. हे बदल स्वीकारल्यास कर्ज मिळेल अशा प्रकारच्या अटी घालण्यात आल्या. या नव्या धोरणांचा फटका आशिया, दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेमधील विकसनशील देशांना बसला. मदतीचा दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने या देशांनी सर्व अटी स्वीकारल्या. त्याचे गंभीर परिणाम त्या देशांना भोगावे लागले. या देशांमधील अनेक लोक दारिद्र्य रेषेखाली ढकलले गेले. आधीच गरीब असलेल्यांची अवस्था अधिक बिकट झाली. आरोग्याच्या समस्या उभ्या राहील्या. बरीच मुले शिक्षणापासून वंचित राहीली, कूपोषणाची बळी ठरली.

१९८९ नंतर बँकेच्या धोरणांमध्ये पुन्हा बदल करण्यात आले. अनेक स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या टीकेला प्रतिसाद देत बँकेने आपली धोरणे पुन्हा विकासोन्मुख करण्याचा प्रयत्न केला. आज बँक पुन्हा दारिद्र्यनिवारण आणि पर्यावरण संरक्षण या विषयांवर आपले लक्ष केंद्रीत करीत आहे.

बँक केवळ आर्थिक मदत देत नाही तर दिलेली मदत योग्य लोकांपर्यंत पोहोचते आहे की नाही त्याची तपासणी करते. ज्या प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन दिलेला असेल त्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवते.

गेल्या ६० वर्षांच्या अनुभवातून प्रत्येक राष्ट्रासाठी वेगळ्या प्रकारच्या विकास योजनांची गरज असते व प्रत्येक ठिकाणी त्या वेगळ्या प्रकारे राबवाव्या लागतात हा महत्त्वाचा मुद्दा बँकेने लक्षात घेतला आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधी - भूमिका आणि कार्ये

**स्थापना – १९४४**

**सदस्य – १८९**

**मुख्यालय – वॉशिंग्टन डी. सी. (अमेरिकेची राजधानी)**

**व्यवस्थापकीय संचालक – ख्रिस्तीन लागार्द (फ्रेंच नागरिक) - या पदावर येणारी पहिली महिला. 2011 पासून. 11 वी व्यवस्थापकीय संचालक.**

***स्थापना***

१९४४ साली जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीची स्थापना झाली. १९४७ साली आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली. ही संयुक्त राष्ट्रांची विशेष संस्था आहे. ४५ राष्ट्रे त्याची संस्थापक सदस्य आहेत. आज जगातील 188 राष्ट्रे त्याची सदस्य आहेत. निधीचे मुख्यालय अमेरिकेच्या राजधानीत – वॉशिंग्टन येथे आहे. १९६० च्या दशकात अनेक वसाहतींना स्वातंत्र्य मिळाले. नव्या स्वतंत्र राष्ट्रांनी सदस्यत्व घेतल्यामुळे IMF ची सदस्य संख्या वाढली. १९९१ मध्ये सोव्हिएट युनियनच्या विघटनानंतर आणि जवळ जवळ सर्वच साम्यवादी राष्ट्रांनी मुक्त बाजारपेठेची अर्थव्यवस्था स्वीकारली. ही सर्व राष्ट्रे नंतर त्यामुळे निधीच्या सदस्य संख्येत भर पडली.

१९३० च्या जागतिक मंदीची पुनरावृत्ती टाळणे हे या निधीच्या स्थापने मागचे एक उद्दीष्ट होते.

इतर उद्दीष्टे

१. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याला चालना देणे
२. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा समतोल विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे
३. चलन विनिमय दरांमध्ये स्थिरता राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे
४. आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचा व्यवहार सुलभ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे

५. आर्थिक संकटे टाळण्याचा प्रयत्न करणे व प्रसंगी संकटात सापडलेल्या राष्ट्रांना मदत करणे.
६. एकूण आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्थिर राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे
७. विकासाला चालना देऊन दारिद्र्य निवारणात मदत करणे.
८. विविध राष्ट्रांना समर्थ अर्थव्यवस्था निर्माण करण्यात मदत करणे.

***संघटना***

**बोर्ड ऑफ गव्हर्नर्स**

निधीचे एकूण 188 सदस्य आहेत. जागतिक बँकेचे सदस्यत्व हवे असल्यास आधी निधीचे सदस्य होण्याची अट आहे. सर्व १८९ सदस्यांचे मिळून निधीचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्स तयार होते. बोर्ड ऑफ गव्हर्नर्स ही निधीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. यामध्ये प्रत्येक देशाचा किंवा देशांच्या गटाचे प्रतिनिधीत्व करणारा एक गव्हर्नर आणि एक पर्यायी गव्हर्नर असतो. गव्हर्नर ची नियुक्ती सदस्य राष्ट्रांकडून केली जाते. बहूतेक तो त्या देशाचा अर्थमंत्री किंवा त्या देशाच्या केंद्रीय बँकेचा गव्हर्नर असतो. भारताचे अर्थमंत्री भारताचे प्रतिनिधीत्व करतात. आंतरराष्ट्रीय नाणे निधीची सर्व सत्ता बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या हाती असते. त्यांची बैठक वर्षातून एकदा बोलावली जाते.

**कार्यकारी मंडळ** (Board of Governors)

निधीच्या १८९ सदस्य राष्ट्रांमधून कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडले जातात. त्यामध्ये सदस्य राष्ट्रांनी किंवा राष्ट्रांच्या गटांनी नियुक्त केलेले किंवा निवडून दिलेले २४ सदस्य असतात. अमेरिका, रशिया, सौदी अरेबिया आणि चीन सारख्या मोठी अर्थव्यवस्था असणा-या राष्ट्रांचे स्वतंत्र सदस्य असतात तर छोटी राष्ट्रे गट करून सदस्य निवडुन पाठवतात. असा सर्वात मोठा गट २४ राष्ट्रांचा आहे. कार्यकारी मंडळ आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे रोजचे कामकाज पाहते. आठवड्यातून अनेकदा त्यांच्या बैठका होतात. सध्या (एप्रिल २००९) श्री. आदर्श किशोर हे भारताचे प्रतिनिधी मंडळात आहेत. बांग्लादेश (५,५८३ मते), भूतान (३१३ मते), भारत (४१,८३२ मते) आणि श्रीलंकेची (४,३८३ मते) एकूण ५२,११२ मते मिळून ते कार्यकारी मंडळावर नियुक्त झाले.

**कोटा**

आतरराष्ट्रीय नाणे निधी मध्ये प्रत्येक राष्ट्राचे स्थान त्याच्या आर्थिक ताकदीवर ठरते. प्रत्येक राष्ट्राला एक कोटा ठरवून दिलेला आहे. प्रत्येक राष्ट्राचा कोटा त्याच्या अर्थव्यवस्थेच्या एकूण आकारावर ठरतो. अमेरिकेचा कोटा सर्वात अधिक म्हणजे १६.७७ टक्के इतका आहे, तर पालाऊ या (फिलिपाईन्सच्या जवळ पॅसिफिक महासागरात छोट्या बेटावर वसलेले राष्ट्र) छोट्या राष्ट्राचा कोटा सर्वात कमी म्हणजे ०.०१ टक्के इतका आहे. कोटा म्हणजे एखाद्या राष्ट्राला निधी कडून मिळू शकणारी कमाल मदत. ते राष्ट्र निधीला भरत असलेली वर्गणी ( subscription) साधारणपणे तितकीच असते. एप्रिल २००९ च्या आकडेवारीप्रमाणे भारताचा कोटा ४,१५८.२० दशलक्ष SDR इतका आहे – तो निधीच्या एकूण कोट्याच्या १.९१ टक्के इतका होतो. जेवढा कोटा असतो तेवढीच वर्गणी त्या राष्ट्राला भरावी लागते. सदस्यत्व स्वीकारल्यानंतर कोट्याचा २५ % भाग मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय चलनामध्ये आणि उरलेला ७५ % भाग स्वतःच्या चलनामध्ये भरावा लागतो. साधारणपणे दर पाच वर्षांनी कोट्याचा आढावा घेतला जातो. १९९८ मध्ये कोट्यांमध्ये ४५% वाढ करण्यात आली. २००३ आणि २००८ (१२ वी आणि १३ वी बैठक) च्या आढावा बैठकांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आली नाही. मात्र २००६ आणि २००८ मध्ये कोट्यामध्ये अनुक्रमे १.८ आणि ९.५ टक्के विशेष वाढ करण्यात आली. कोट्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल करण्यासाठी किमाव ८५% सदस्यांची मंजुरी लागते.

प्रत्येक राष्ट्राची मते त्या त्या राष्ट्राच्या कोट्याच्या आधारावर ठरतात. प्रत्येक राष्ट्राला किमान २५० मते असतात. त्यावर प्रत्येक लाख SDR वर एक मत मिळते. अमेरिकेची ३,७१,७४१ मते आहेत. म्हणजेच ३७ अब्ज SDR पेक्षा थोडा अधिक इतका अमेरिकेचा कोटा आहे. तेवढी रक्कम अमेरिकेला वर्गणी म्हणून भरावी लागते आणि तेवढीच आर्थिक मदत तीला मिळू शकते. काही विशेष प्रसंगी त्यापेक्षा अधिक मदतही मिळू शकते.

***SDR (Special Drawing Rights)***

SDR हे निधीने १९६९ साली निर्माण केलेले विशेष चलन आहे. सुरवातीस त्याची किंमत सोन्याच्या किंमतीच्या आधारे ठरविण्यात येत होती. आता त्याची किंमत जपानी येन, ब्रिटीश पौंड, युरो आणि अमेरिकन डॉलरच्या आधारे ठरविण्यात येते. ब्रेट्नवुड्स व्यवस्थेमध्ये असलेल्या निश्चित विनिमय दराला आधार देण्यासाठी SDR ची निर्मिती करण्यात आली. १९७३ मध्ये ब्रेट्नवुड्स व्यवस्थाच कोसळल्यामुळे SDR चे महत्व कमी

झाले. SDR हे निधीचे स्वतंत्र चलन नाही किंवा तेवढ्या रकमेचा दावा एखाद्या राष्ट्राला करता येतो असेही नाही.

**व्यवस्थापकीय संचालक**

आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे कार्यकारी मंडळ व्यवस्थापकीय संचालकाची निवड करते. कोणत्याही कार्याकारी संचालकाला या पदासाठी आपले नामांकन करता येते. या पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास कार्यकारी मंडळ शक्यतो सहमतीने निवड करण्याचा प्रयत्न करते. डॉमनिक स्ट्रॉस हे फ्रेंच अर्थतज्ञ, नोव्हेंबर २००७ पासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी, निधीचे १० वे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहत होते. 2011 साली त्यांच्यावर काही आरोप झाले त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. तेव्हापासून ख्रिस्तीन लागार्द या फ्रेंच महिलेची या पदावर 11 वी व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती झाली. व्यवस्थापकीय संचालक आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे नेतृत्व करतो. आंतरराष्ट्रीय नाणे निधी मध्ये १७ विविध खाती आहेत. या सर्व खात्यांमधील सर्व कर्मचा-यांचा तो प्रमुख असतो आणि तोच निधीच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष असतो. व्यवस्थापकीय संचालकाच्या मदतीला आणखी तीन उपसंचालक असतात.

व्यवस्थापकीय संचालकांचा हा गट सर्व कर्मचा-यांच्या कामावर लक्ष ठेवतो तसेच ते सदस्य राष्ट्रांच्या शासनांशी उच्च पातळीवरून संपर्क ठेवून असतात. प्रसारमाध्यमे, अशासकीय संघटना, विचारवंत आणि इतर संस्थांशी संपर्क ठेवण्याचे कामही ते करतात. निधी त्याच्या सदस्य राष्ट्रांच्या सरकारांना जबाबदार असतो. यांची वर्षातून एकदा बैठक होते.

**अर्थव्यवस्था**

सदस्य राष्ट्रांनी भरलेली वर्गणी हे निधीच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. गरीब देशांना सवलतीच्या दरात कर्ज देण्यासाठी विशेष निधी उभारला जातो. त्यामध्ये श्रीमंत राष्ट्रे आपले योगदान देतात.

## ***धोरण आणि कार्य***

१९४५ साली पहिल्यांदा फ्रान्सने निधी कडून मदत घेतली. (त्यावेळच्या फ्रान्सच्या शासनामध्ये काही कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते. IMF ने हे सदस्य काढून टाकण्याची

मागणी केली. त्यांना काढून टाकल्यानंतर काही तासातच फ्रान्सचे कर्ज मंजूर झाले – अशी बातमी त्यावेळेस चर्चेत होती.) १९७० पर्यंत प्रगत देशांनीच मुख्यतः या कर्जांचा लाभ घेतला. आंतरराष्ट्रीय नाणे निधी कडे कोणत्याही क्षणी आर्थिक अडचणीत सापडलेल्या राष्ट्रांना कर्ज म्हणून देण्यासाठी २०० अब्ज डॉलर्स इतकी रक्कम उपलब्ध असते. गरज पडल्यास अधिक ५० अब्ज डॉलर्स उभे केले जावू शकतात. आणीबाणीच्या काळात तातडीने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून पैसे उपलब्ध केले जावू शकतात. १९९७ च्या आशियायी आर्थिक संकटाच्या काळात फिलिपाईन्स, थायलंड, इंडोनेशिया आणि कोरिया या देशांना मदत करण्यात आली. २००१ मध्ये तुर्कस्तानला तर २००८ मध्ये जॉर्जियाला तातडीने मदत देण्यात आली. ही कर्जे काही अटींवर मिळतात. परंतू या अटी मूळ समस्या सोडविण्यास उपयुक्त अशाच असतात असे आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे म्हणणे आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडे असलेल्या कोट्याची एकूण रक्कम ३५२ अब्ज डॉलर्स इतकी होते. ३१ मे २००८ च्या हिशेबाप्रमाणे निधीने ६५ देशांना १९.४ अब्ज डॉलर्सचे कर्ज दिले आहे.

निधी मुख्यतः तीन प्रकारची कार्ये करतो – निरिक्षण, तांत्रिक सहाय्य आणि कर्जपुरवठा. नाणेनिधी वर्षातून दोन वेळा World Economic Outlook नावाचा अहवाल प्रसिद्ध करते. यामध्ये जागतिक आणि प्रादेशिक घडामोडींचा आढावा घेतला जातो तसेच भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचप्रमाणे वर्षातून एकदा प्रत्येक सदस्य राष्ट्राला त्याच्या अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करून सल्ला दिला जातो. यामध्ये आंतरराष्ट्रीय आणि अंतर्गत आर्थिक स्थिरता राखण्यासंबंधीच्या धोरणांचा समावेश असतो. ब-याच वेळा सदस्य राष्ट्रांना मोफत तांत्रिक सल्ला आणि प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये चलन व्यवस्था, बँकांचे नियंत्रण, आर्थिक धोरण, विनिमय दर या विषयांचा समावेश असतो.

## जागतिक व्यापार संघटना - भूमिका आणि कार्ये

**स्थापना – १९९५**
**सदस्य – 161 (एप्रिल 2015)**
**मुख्यालय – जिनिव्हा, स्वित्झर्लंड**
**संचालक – पास्कल लॅमी (2005-2013) रॉबर्टो अझेव्हेडो (2013 पासून)**

(http://www.wto.org/english/thewto_e/whatis_e/tif_e/tif_e.htm या संकेतस्थळावर WTO विषयी सर्व प्राथमिक माहिती उपलब्ध आहे.)

जागतिक व्यापार संघटनेची स्थापना १९९५ मध्ये झाली. त्यादृष्टीने या संघटनेला सर्वात तरूण आंतरराष्ट्रीय संघटना म्हणता येईल. परंतु प्रत्यक्षात या संघटनेने १९४५ साली झालेल्या गॅट ( General Agreement on Trade and Tariff – GATT – व्यापार आणि करआकारणी संदर्भातील सर्वसाधारण करार, अर्थातच हा करार आंतरराष्ट्रीय आहे हे गृहीत आहे.) कराराची जागा घेतली, म्हणजेच या संस्थेला साधारण ६३ वर्षांचा इतिहास आहे.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जेत्या राष्ट्रांना एक आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (International Trade Organisation – ITO) स्थापन करायची होती. (अडचणीच्या काळात आपली मदत करण्यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय संघटना आपल्या डोक्यावर असावी असे प्रत्येक राष्ट्र प्रमुखाला आणि शासनाला वाटते असे प्रा. स्टीगलीट्झ म्हणतात.) परंतु ती संकल्पना प्रत्यक्षात येवू शकली नाही. त्याऐवजी गॅटची निर्मिती करण्यात आली. गॅटचे मुख्य उद्दीष्ट आंतरराष्ट्रीय व्यापारामधील अडथळे दूर करणे हे होते. गॅट हा एक करार होता, संघटना नव्हती हे लक्षात ठेवले पाहिजे.

### *गॅट करार*

दोन राष्ट्रांनी एकत्र येवून करार करण्यापेक्षा अनेक राष्ट्रांनी एकत्र येवून करार करावा यावर गॅट मध्ये अधिक भर देण्यात आला होता. गॅटच्या २३ संस्थापक सदस्यांमध्ये अमेरिका, कॅनडा, इत्यादी विकसित देशांबरोबर भारत, श्रीलंका, पाकिस्तान क्युबा या विकसनशील देशांचाही सहभाग होता याची विशेष नोंद घेणे गरजेचे आहे.

गॅटचा इतिहास तीन टप्प्यांमध्ये विभागला जावू शकतो. गॅटच्या पहिल्या फे-यांमध्ये केवळ आयात-निर्यात कर ( Tariff) कमी करण्यावर भर होता. परंतु पुढच्या चर्चांमध्ये इतर अनेक विषयांचा समावेश करण्यात आला. पहिला टप्पा साधारणपणे १९४७ च्या इंग्लंड मधील टोरक्वे येथिल चर्चेच्या फेरी पर्यंत पूर्ण झाला. दुसरा टप्पा १९७९ मध्ये टोकीयो फेरीनंतर पूर्ण झाला व तिस-या टप्प्यात केवळ उरुग्वे फेरीचा समावेश होतो. थोडक्यात चर्चांचा इतिहास खालीलप्रमाणेः-

१९४७ जिनिव्हा (स्वित्झरलंड) – अमेरिकेच्या सहकार्यामुळे चर्चेची पहिली फेरी यशस्वी झाली.

१९४९ अनेसी (फ्रान्स) – दहा नवीन सदस्य सामिल झाले.

१९५०-५१ टोरक्वे (यु, के. )

१९५५-५६ जिनिव्हा (स्वित्झरलंड) – १९५० च्या दशकात गॅट अंतर्गत फारशा हालचाली झाल्या नाहीत.
१९६०-६२ डिलॉन जिनिव्हा (स्वित्झरलंड)

१९६४-६७ केनेडी – या काळात युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी ( EEC) - युरोपिय आर्थिक समुदाय विकसित झाला. अमेरिकेला मोठा प्रतिस्पर्धी निर्माण झाला. या फेरी मध्ये गॅटच्या इतिहासात पहिल्यांदाच करार करण्यात अडचणी निर्माण झाल्या – ब-याचशा चर्चा अर्धवट सोडून द्याव्या लागल्या.

१९७३-७९ टोकियो – या फेरीच्या दरम्यान संपूर्ण जग तेलाच्या समस्येमध्ये बुडून गेले होते. चर्चे दरम्यान अमेरिका आणि EEC चे वर्चस्व कायम राहिले. विकसनशील राष्ट्रांना फारशा सवलती मिळाल्या नाहीत, त्यामुळे ते नाराज झाले.

१९८६-९४ ऊरुग्वे – या फेरीच्या दरम्यान जगभर मंदीचे सावट होते. अमेरिका, जपान आणि EEC दरम्यान व्यापारासंदर्भात अनेक वाद निर्माण झाले. अमेरिका आणि EEC मध्ये शेतीमालाच्या संदर्भात वाद होते. जपानने आपला बाजार अमेरिकेसाठी खुला करावा असे अमेरिकेचे म्हणणे होते. जगभरच्या राष्ट्रांनी आपले बाजार पुन्हा बंदीस्त करायला सुरवात केली. चर्चा करण्यासाठी चार प्रमुख गटांची स्थापना करण्यात आली होती यामध्ये –

१) व्यापारातील अडथळे आणि त्यासंबंधित बाबी -
२) विशिष्ठ क्षेत्रासंबंधित बाबी – शेती , नैसर्गीक संसाधने, सेवा क्षेत्र, टेक्सटाईल आणि कापड उद्योग, ट्रॉपिकल उत्पादने
३) प्रक्रिया
४) इतर बाबी

चर्चेची नवी फेरी सुरु करावा अशी मागणी ब-याच राष्ट्रांकडून केली जात होती परंतु EEC त्याकडे दुर्लक्ष केले.

### ***डंकेल ड्राफ्ट***

कोणत्याच बाबींवर एकमत होत नाही आणि अंतिम निर्णय होत नाही हे लक्षात घेवून १९९१ मध्ये गॅटचे सेक्रेटरी जनरल ऑर्थर डंकेल यांनी स्वतःच एक पॅकेज तयार केले, अमेरिकेने ते मान्य केले परंतु EEC ला ते मान्य नव्हते. राजकारण्यांनी वायफळ

चर्चा सोडून मुक्त व्यापाराच्या विकासासाठी धाडसाने काही निर्णय घेतले पाहिजेत असे त्यांचे मत होते. भारतातही डंकेल प्रस्तावाला बराच विरोध झाला होता. विशेषतः डाव्या पक्षांनी याला विरोधाचा प्रमुख मुद्दा बनविला होता. भारत सरकार आपले सार्वभौमत्व गॅट करार करुन गमावणार आहे अशी चर्चा रंगली होती.

ब-याच विलंबानंतर मोरोक्को येथे १९९४ मध्ये उरुग्वे पॅकेजवर सही करण्यात आली. यामध्ये डंकेल प्रस्तावातील ब-याच मुद्दयांचा समावेश करण्यात आला होता. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची निर्मिती करण्यात आली.

गेल्या ५० वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये लक्षणीय वाढ झाली. वस्तूंच्या निर्यातीमध्ये दरवर्षी साधारणपणे ६ टक्के वाढ होत गेली. आंतरराष्ट्रीय व्यापार १९५० च्या पातळीपेक्षा २२ पटींनी वाढला आहे. गॅट आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेमुळे हा व्यापार सुरळीत झाला, व एकुण जगाचा विकास होण्यास मोठी मदत झाली असा जागतिक व्यापार संघटनेचा दावा आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जागतिक पातळीवरील नियम ठरविणीरी जागतिक व्यापार संघटना ही एकमेव संघटना आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार सहज सुलभ आणि शक्य तितक्या मुक्त वातावरणात व्हावा यासाठी प्रयत्न करणे हे जागतिक व्यापार संघटनेचे प्रमुख कार्य आहे. (मुक्त याचा अर्थ राष्ट्रांनी शक्यतो व्यापारावर कोणतीही बंधने घालू नयेत. राष्ट्रीय हीत साध्य करण्यासाठी ब-याच वेळा राष्ट्रे आयात निर्यातीवर बंधने घालतात. उदा. आयात मालावर प्रचंड आयात कर लागू करणे – यामुळे या मालाची बाजारातील किंमत वाढते, स्थानिक मालाशी आयात माल स्पर्धा करु शकत नाही. )

या कार्यामुळे उत्पादक आणि ग्राहक अशा दोघांचेही हित साध्य केले जाते – ग्राहकाला वस्तूची निवड करण्यास भरपूर वाव मिळतो, तसेच चांगल्या दर्जाची वस्तू मिळण्याची शक्यता वाढते. उत्पादक आणि निर्यातदारांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होते.

WTO मध्ये सर्व निर्णय सहमतीने घेतले जातात. काही वाद उद्‌भवल्यास तंटा निवारण व्यवस्थेमार्फत तो सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे वाद वाढून त्याचे पर्यवसान लष्करी कारवाई अथवा युद्‌धामध्ये होण्याचा धोका टाळता येतो.

व्यापारामधील अडथळे दूर करता करता WTO, राष्ट्रे आणि लोकांच्या परस्पर संबंधांमधील अडथळे दूर करते असा संघटनेचा दावा आहे. संघटनेने केलेले करार बहुसंख्य

सदस्य राष्ट्रांनी त्यांच्या कायदेमंडळांकडून मान्य करून घेतलेले असतात. करार शासनाकडून केले जातात, त्यावर सह्या शासनाच्या असतात पण या करारांचा उद्देश उत्पादक, आयातदार आणि निर्यातदार यांना सहज व्यवहार करता यावा हा असतो.

उरुग्वे फेरीनंतरही राष्ट्रांमधील वाटाघाटी चालूच राहिल्या. फेब्रुवारी १९९७ मध्ये ६९ देशांनी दूरसंचार ( telecommunication services) सेवांच्या संदर्भात उदारीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे करार केले. त्याच वर्षी ४० देशांनी माहिती तंत्रज्ञानासंबंधीच्या उत्पादनांचा करमुक्त व्यापार करण्यासंबंधी करार केला. ७० देशांनी वित्तीय क्षेत्रासंबंधीचा करार केला. वित्तीय क्षेत्रामध्ये बँकींग, विमा, रोखे व्यवहार, आणि आर्थिक व्यवहारांसंबंधीची माहिती इ. बाबींचा समावेश होतो. २००० साली शेती आणि सेवाक्षेत्रांसंबंधी नवीन वाटाघाटींना सुरवात झाली.

MOST FAVOURED NATION PRINCIPLE

जागतिक व्यापार संघटनेच्या करारांप्रमाणे संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना इतर सर्व सदस्य राष्ट्रांबरोबर समान आर्थिक व्यवहार करावे लागतात. कोणत्याही एका राष्ट्रास आयात कर कमी करणे किंवा तत्सम कोणत्याही सवलती देता येत नाहीत. जो नियम एका राष्ट्रास लागू तोच इतर सर्वांना लागू करावा लागतो. यालाच मोस्ट फेवर्ड नेशनचे तत्व असे म्हणतात. पण या तत्वाला काही अपवाद आहेत. काही देश आपापसात काही वस्तूंच्या व्यापारासंबंधी मुक्त व्यापाराचे करार करू शकतात. किंवा काही विकसनशील देशांना विशेष सवलती देता येतात. काही वस्तूंचा व्यापार अन्याय्य पद्धतीने होतो आहे असे वाटल्यास त्या वस्तूंबाबत अधिक कर लागू करण्यासंबंधीचा किंवा त्या वस्तूंच्या व्यापारावर बंधन घालण्याचा अधिकार संबंधित राष्ट्रांना असतो.

### ***दोहा विकास कार्यक्रम (Doha Development Agenda)***

नोव्हेंबर २००१ मध्ये दोहा (कतार) येथे जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्री परिषदेत विकसनशील राष्ट्रांशी संबंधित ‘दोहा विकास कार्यक्रमा ’ च्या चर्चेला सुरवात झाली. गेली दहा वर्षे ही चर्चा चालू आहे. ती चर्चा आजही पूर्णत्वाला गेलेली नाही.

जगभरातील व्यापारातील अडथळे दूर करणे हे या चर्चेचे प्रमुख उद्दीष्ट होते. त्यामुळे व्यापारामध्ये वाढ होईल ही अपेक्षा आहे. यामध्ये शेती आणि सेवाक्षेत्रांसंबंधी सुरु झालेल्या वाटाघाटींचा समावेश करण्यात आला. विकसनशील देशांच्या आग्रहावरून या चर्चेला सुरवात झाली. विकसनशील राष्ट्रांना सध्याचे करार अमलात आणताना काही अडचणींना तोंड द्यावे लागते – त्यासंबंधी चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने व्यापार आणि पर्यावरण यासंबंधीच्या चर्चेला सुरवात झाली.

न्याय्य आणि मुक्त व्यापार प्रत्क्षात आणण्याच्या दृष्टीने जागतिक व्यापार संघटनेचे साधे तत्व आहे – चर्चा करुन, वाटाघाटी करुन करार करा आणि त्यांचे तितक्याच प्रामाणिक पणे पालन करा. जागतिक व्यापार संघटनेचे नियम म्हणजेच सदस्यांनी सहमतीने केलेले करार. गॅट हा जागतिक व्यापार संघटनेच्या वस्तूंच्या व्यापाराचा मुख्य कायदेशीर आधार आहे – म्हणजे वस्तूंचा व्यापार गॅट करारातील तरतूदींप्रमाणे चालतो. उरुग्वे वाटाघाटींमध्ये सेवाक्षेत्र, बौद्धिक संपदा आणि तंटा निराकरणासंबंधी नवीन नियम केले गेले. या व्यवस्थेमध्ये विकसनशील राष्ट्रांच्या सोयीच्या दृष्टीने काही तरतुदी करण्यात आल्या आहेत असा जागतिक व्यापार संघटनेचा दावा आहे. नव्या करारांप्रमाणे वस्तूंच्या व्यापारासंबंधीचे सर्व नियम आता सेवा क्षेत्रालाही लागू होणार आहेत. याचा फायदा परदेशात व्यवसाय करु इच्छिणा-या बॅंका, विमा कंपन्या, दूरसंचार क्षेत्रातील कंपन्या, प्रवाशांसाठी सहलींचे आयोजन करणा-या कंपन्या, हॉटेल्स इत्यादींना मिळेल. या नव्या तत्वांचा समावेश सेवा क्षेत्रासंबंधीच्या नव्या करारात करण्यात आला आहे – General Agreement on Trade in Services (GATS) या कराराच्या पलीकडे काही राष्ट्रांनी विशेष सवलती जाहीर केल्या आहेत.

बौद्धिक संपदेच्या रक्षणासाठी केलेले नियम कॉपाराईट्स, पेटंट्स, ट्रेडमार्कस् इत्यादींच्या संरक्षणाचे मार्ग दाखवतात.

जागतिक व्यापार संघटनेने पहिल्या दहा वर्षात ३०० वादांचा निकाल लावला आहे. १९४७-९४ एवढ्या ४७ वर्षांच्या काळात गॅटने साधारण एवढ्याच वादांचा विचार केला.

### *विकसनशील राष्ट्रे*

विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांची जागतिक व्यापार संघटनेतील एकूण संख्या ७५ टक्क्यांहून अधिक आहे. त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेच्या प्रत्येक करारामध्ये त्यांच्यासाठी विशेष तरतूदी केलेल्या असतात. त्यांना करारांची अंमलबजावणी

करण्याकरीता अधिक वेळ दिला जातो, त्यांना व्यापाराच्या अधिक संधी मिळाव्यात यासाठी खास उपाय केलेले असतात, सर्व सदस्य राष्ट्रांनी त्यांच्या व्यापारी हितसंबंधांकडे विशेष लक्ष द्यावे यासाठी खास तरतूदींचा समावेश करारांमध्ये केलेला असतो, त्यांच्या देशात जागतिक व्यापार संघटनेच्या कामासाठी मूलभूत सोयीसुविधांच्या निर्मितीसाठी विशेष मदत केली जाते, तसेच त्यांना तांत्रिक सुधारणांची विशिष्ठ पातळी गाठण्यासाठी मदत केली जाते. विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांनी जागतिक व्यापारामध्ये अधिकाधिक भाग घ्यावा यासाठी जागतिक व्यापार संघटना विशेष प्रयत्न करते.

***जागतिक व्यापार संघटनेची कार्ये आणि रचना***

१) जागतिक व्यापार संघटना केवळ मुक्त व्यापाराचेच समर्थन करते असे नाही - काही वेळेस व्यापारावर बंधने घालण्यासही सुचविते – पर्यावरण रक्षणाचा प्रश्न, ग्राहक हीत रक्षणाचा प्रश्न किंवा एखाद्या रोगाचा प्रसार थांबवायचा असल्यास.
२) जागतिक व्यापार संघटना व्यापारी करार करण्यास मदत करते, वाद सोडविते परंतु तिच्याकडे कोणतीही अतिमानवी ताकद नाही किंवा जादूई शक्ती नाही, ज्याचा उपयोग करुन ती कोणताही प्रश्न चुटकीसरशी सोडवू शकेल. जागतिक व्यापार संघटना म्हणजे एक टेबल आहे. राष्ट्रांनी त्या टेबलाभोवती बसून आपले हीत साध्य करून घ्यायचे आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत, न्याय्य, मुक्त आणि ( predictable) होण्यासाठी प्रयत्न करणे हे जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य उद्दीष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना खालील कार्ये करतेः-

१) करारांची अंमलबजावणी (Administration) करणे
२) वाटाघाटींसाठी राष्ट्रांना व्यासपीठ निर्माण करुन देणे
३) व्यापारा संदर्भातील वाद सोडविणे
४) राष्ट्रांच्या व्यापारी धोरणांचा आढावा घेणे – प्रत्येक देशाची आढाव्याची तारीख ठरवून दिलेली असते, त्यानुसार ठराविक काळानंतर नियमित पणे आढावा घेतला जातो. यामध्ये त्या त्या देशांकडून पाठविल्या गेलेल्या अहवालांचा तसेच संघटनेच्या सचिवालयाने त्या देशासंबंधी तयार केलेल्या अहवालाचा अभ्यास केला जातो.
५) तांत्रिक मदत आणि प्रशिक्षण कार्यक्रम याद्वारे विकसनशील राष्ट्रांना व्यापारी धोरणांच्या आखणी बाबत मदत करणे.

६) इतर आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सहकार्य करणे.

***रचना***

आजमितीस जागतिक व्यापार संघटनेचे एकूण 161 सदस्य आहेत. (26 एप्रिल 2015 रोजी सेशल्स या देशाला सदस्यत्व मिळाले. आणखीन जवळपास 23 देश सदस्यत्वासाठी प्रयत्न करीत आहेत. जागतिक व्यापाराच्या ९७ टक्के व्यापार जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांप्रमाणे चालतो.

जागतिक व्यापार संघटनेचे सर्व निर्णय सर्वसंमतीने घेतले जातात – सर्व सदस्य राष्ट्रांची संमती असेल तरच एखादा निर्णय घेतला जातो. बहुसंख्येच्या आधारावर निर्णय घेता येणे शक्य आहे, परंतु तसे केल्याचे एकही उदाहरण जागतिक व्यापार संघटनेच्या इतिहासात नाही. शिवाय राष्ट्राचा प्रत्येक निर्णय त्याच्या कायदेमंडळाकडून संमत केलेला असतो.

निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार वर्षातून किमान दोन वेळेस भरणा-या मंत्री पातळीवरील परिषदेला असतो. या परिषदेलाच जागतिक व्यापार संघटनेत निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार असतो. त्याच्या खालोखाल जनरल कौन्सिल काम पाहते. यामध्ये सदस्य देशांचे राजदूत, जिनिव्हा येथिल जागतिक व्यापार संघटनेच्या मुख्यलयातील शिष्टमंडळातील सदस्य व काही वेळेस त्या त्या देशांकडून पाठविले गेलेले विशेष सदस्य या सर्वांचा समावेश जनरल कौन्सिल मध्ये होतो. कौन्सिलच्या बैठका वर्षातून ब-याच वेळेस होतात. राष्ट्रांच्या व्यापारी धोरणांचा आढावा घेणे आणि तंटा निराकरण करण्याचे काम कौन्सिल करते.

त्याच्या खालच्या पातळीवर वस्तू परिषद, सेवा परिषद, आणि बौद्धिक संपदा परिषद आपले अहवाल जनरल कौन्सिलला सादर करतात.

इतर अनेक विशेष समित्या, कार्यगट विकास, पर्यावरण, सदस्यत्वासाठीचे अर्ज, नव्याने झालेले प्रादेशिक व्यापार करार यांचा अभ्यास करतात.

जिनिव्हा मधील जागतिक व्यापार संघटनेच्या कार्यालयात साधारण 639 कर्मचारी आहेत. ते मुख्य संचालकांच्या ( Director General – 2013 सालापासून ब्राझीलचे रॉबर्टो अव्हेझेडो हे पद भूषवित आहेत. ) नेतृत्वाखाली काम करतात. त्यांच्या हाताखाली चार उपसंचालक कार्य करतात. जिनिव्हाच्या बाहेर सचिवालयाची शाखा नाही. इतर

आंतरराष्ट्रीय संघटनांच्या सचिवालयांना असतात तसे निर्णय घेण्याचे अधिकार या सचिवालयाला नाहीत कारण सर्व निर्णय सदस्य राष्ट्रे घेतात. सर्व मंत्रीपातळीवरील बैठका, जनरल कौन्सिल, समित्या इत्यादींना तांत्रिक आधार, माहिती देण्याचे मुख्य कार्य हे सचिवालय पार पाडते. विकसनशील देशांना तांत्रिक बाबतीत मदत करण्याचे कार्यही सचिवालय करते. जागतिक व्यापाराचे विश्लेषण करुन आमजनतेला आणि माध्यमांना माहिती देणे, तसेच तंटा सोडविण्याच्या कामात कायदेशीर मदत करण्याचे व नव्याने सदस्य होवू इच्छिणा-या राष्ट्रांना सल्ला देण्याचे कार्यही सचिवालय करते. सचिवालयाचा वार्षिक अर्थसंकल्प 197 दशलक्ष स्विस फ्रँक्स पर्यंत जातो.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांच्या कार्याचे परिक्षण

जोसेफ स्टीगलीट्झ हे अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक. त्यांना २००१ सालचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी जागतिक बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ या नात्याने १९९७ ते २००० सालापर्यंत कार्य केले आहे. त्यांचा तिथल्या निर्णयप्रकियेत महत्त्वाचा सहभाग होता. या संस्थांच्या कार्यपद्धतीमधील दोष त्यांच्या लक्षात आले. तेथून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी Globalisation and its discontents या आपल्या पुस्तकामध्ये आपले विचार प्रकट केले आहेत. आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना यांच्या कार्याचे परिक्षण आपण त्यांच्या विचारांच्या आधारने करण्याचा प्रयत्न करू.

स्टीगलीट्झ यांचा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला विरोध नाही. त्यांचा एकूणच भांडवलवादाला विरोध नाही. परंतू जागतिकीकरणाच्या प्रक्रिया ज्या पद्धतीने राबविल्या गेल्या त्याला विरोध आहे. त्यामुळे तिस-या जगातील देशांचे आणि विशेषतः या देशांमधील गरीबांचे खूप नुकसान झाले असे जोसेफ स्टीगलीट्झ यांचे मत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीने या सर्व धोरणांचा पुरस्कार केला.

रशिया मध्ये या आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांना चलनाचे अवमूल्यन करु नका, तसे केल्यास चलनवाढ होईल आणि अर्थव्यवस्था धोक्यात येईल असा इशारा दिला. या दबावाखाली रशियाने १९९१ ते १९९८ आपल्या चलनाचे अवमूल्यन केले नाही. परंतू त्यामूळे अर्थ व्यवस्थेत कोणतीच सुधारणा झाली नाही. १९९८ मध्ये रशियन सरकारने या संस्थांच्या दबावाला न जुमानता अवमूल्यन केले, अर्थव्यवस्थेत आपल्याला हवे तसे

बदल केले. त्यांचे प्रश्न सुटत गेले आणि आज रशियाची अर्थव्यवस्था भक्कम स्थितीत असलेली दिसते.

आशियामध्ये १९९७ मध्ये निर्माण झालेल्या आर्थिक संकटालाही याच संस्था जबाबदार आहेत असे स्टीगलीट्झ यांचे मत आहे. मलेशिया, मेक्सिको, पेरु, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया या देशांना या संकटाचा मोठा फटका बसला. भारताने संथ गतीने ही प्रक्रिया लागू करण्याचे धोरण स्वीकारले त्यामुळे भारतात एवढे भीषण परिणाम जाणवले नाहीत.

आंतरराष्ट्रीय अर्थ संस्थांनी विकसनशील राष्ट्रांना घाईगडबडीने व्यवस्था खुली करण्यास भाग पाडले. त्यांना कर्ज किंवा मदत देताना त्याप्रकारच्या अटी घातल्या. काही वेळेस नाईलाजास्तव या राष्ट्रांना त्या स्विकाराव्या लागल्या. त्यांच्या कडे आवश्यक त्या मूलभूत सोयीसुविधा नसताना त्यांनी नवीन अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले. विकसनशील देशांमध्ये भांडवली अर्थव्यवस्थेचा सांगाडा अस्तित्वात होता. परंतु १९९० पर्यंत त्या व्यवस्थेला युरोप किंवा अमेरिकेतील सक्षम व्यवस्थे प्रमाणे स्वतंत्र निर्णय घेण्याची सवय नव्हती आणि तेवढे कौशल्यही त्यांच्याकडे नव्हते. ह्या व्यवस्थेला केवळ सरकारी आदेशाचे पालन करणे एवढेच माहीत होते. नव्या वातावरणामध्ये या अर्थव्यवस्था कोलमडून पडल्या. अचानक सर्व व्यवस्था खुली केल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती प्रचंड वाढल्या. सामान्य जनतेला जगणे मुश्कील झाले. काही ठिकाणी प्रतीक्रांतीची भाषा बोलली जावू लागली.

आंतरराष्ट्रीय व्यापारी करार करताना केवळ विकसित राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून विचार केला जातो. विकसनशील राष्ट्रांकडे असलेले तंत्रज्ञान मागास स्वरुपाचे आहे. त्याच्या आधाराने विविध वस्तूंचे उत्पादन करताना पर्यावरणाची हानी होते. पण तेच तंत्रज्ञान वापरण्यशिवाय विकसनशील राष्ट्रांकडे दुसरा पर्याय नसतो. आधुनिक तंत्रज्ञान खर्चिक असते. त्या करिता अधिक भांडवल गुंतवणुकीची व कौशल्यांची आवशक्यता असते. ते भांडवल व ती कौशल्ये या राष्ट्रांकडे नाहीत. आंतरराष्ट्रीय व्यापारी करार करताना पर्यावरणासंबंधित निर्बंध घालून विकसनशील राष्ट्रांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न केले जातात. असे निर्बंध घातल्यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळणे अवघड होवून बसते. ही राष्ट्रे स्पर्धेतून आपोआपच बाद होतात.

अलीकडच्या आर्थिक संकटामुळे जागतिक व्यापारावर परिणाम झाला आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या मते यावर्षी जागतिक व्यापारात ९ टक्के घट होण्याची

शक्यता आहे. जगभरातून मागणी कमी होत आहे आणि व्यापारासाठी भांडवलाची कमतरता भासत आहे. व्यापारात वाढ झाली तर जगाची या संकटातून सुटका होईल अशी आशा जागतिक व्यापार संघटनेला वाटते.

जागतिक व्यापार संघटनेने व्यापार आणखी खुला करण्याचा सल्ला दिला आहे. परंतु त्यामुळे नैसर्गीक संसाधनांवर अधिक ताण पडेल आणि त्याचा परिणाम म्हणजे पर्यावरणाची अधिक हानी होईल. व्यापार खुला झाल्यामुळे विकसीत देशांमधील कंपन्या पर्यावरण रक्षणासंबंधी फार काटेकोर नियम नसलेल्या मागास देशांमध्ये स्थलांतर करतील. अशा देशांमध्ये त्यांचे स्वागत होईल. कारण त्या देशांना भांडवलाची गरज आहे. त्या देशांमध्ये उत्पादन वाढेल पण पर्यावरणाचे न भरून येणारे नुकसान होईल.

## समारोप

या पाठात आपण जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या संकल्पना स्पष्ट करण्यापासून सुरवात केली. त्यानंतर आपण जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक व्यापार संघटना या तीन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संघटना त्यांची रचना, इतिहास आणि त्यांची भूमिका आणि कार्ये थोडक्यात पाहिली.

सोव्हिएट रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव गोर्बाचेव्ह यांनी काही क्रांतीकारक निर्णय घेऊन साम्यवादाच्या शेवटाची आणि जागतिकीकरणाची एकप्रकारे सुरवात करुन दिली. त्यावेळेस म्हणजे १९८५ ते १९९० या काळात जागतिकीकरणाची प्रकिया थांबेल पुन्हा साम्यवादी क्रांती होईल अशी काही लोकांना आशा तर काही लोकांना भीती वाटत होती. परंतु पुढील काही वर्षात ही भीती आणि आशा खोटी ठरली. झालेले बदल अपरिवर्तनिय आहेत. (Irreversible changes) कोणत्याही परिस्थितीत कोणालाही मागे फिरता येणार नाही असे अनेक नेते ठामपणे मांडू लागले. आज ही वस्तुस्थिती आहे. भारतातही अगदी साम्यवादी पक्षाची सत्ता असलेल्या पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये तिथले शासन खाजगीकरणाला आणि परकीय गुंतवणुकीला प्राधान्य देताना दिसते आहे.

याधोरणामुळे प्रस्थापित वर्गाचा, व्यापारी उद्योजकांचा मोठा फायदा झाला. कनिष्ट वर्ग, आदिवासी आणि समाजातील इतर मागास वर्ग यामुळे आणखी मागे फेकले गेले. परंतु आजतरी या व्यवस्थेला पर्याय दिसत नाही. अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील राष्ट्रे याचा पुरस्कार करतात, रशियाने हेच धोरण स्वीकारले आहे, भारत सरकारही हेच करताना दिसते. काही गरीब देशांचा याला विरोध आहे पण त्यांचा आवाज कोणीही ऐकत नाही.

या धोरणांमुळे पर्यावरणाचे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. संपूर्ण जगाला मोठ्या नैसर्गीक आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. या सर्व समस्यांचे समाधान कसे होणार, नव्या व्यवस्थेमध्ये या समस्यांचा सामना करण्याची ताकद आहे का हे सर्व जाणून घेण्यासाठी आपल्याला भविष्याची वाट पहावी लागेल.

**प्रश्न**

1. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या संकल्पना स्पष्ट करा.
2. जागतिक बँकेची जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील भूमिका आणि कार्ये स्पष्ट करा.
3. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील भूमिका आणि कार्ये स्पष्ट करा.
4. जागतिक व्यापार संघटनेची जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील भूमिका आणि कार्ये स्पष्ट करा.
5. शीतयुद्धानंतरच्या जगात जागतिक व्यापार संघटनेपुढे कोणते महत्त्वाचे प्रश्न आहेत?